महाराष्ट्र शासन

# विधि व न्याय विभाग

## सन १९३९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०

## (महाराष्ट्र) मुंबई उद्‌वाहक अधिनियम, ~~१९३९~~

(दिनांक ३ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित)

## Bombay Act No. X of 1939

# The (Mumbai) ~~Bombay~~ Lifts Act, ~~1939~~

(As modified upto 3rd November 2006)

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे ४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित
२००६

[ किंमत : रुपये ६.२० ]

वि (एच) ७३५

# मुंबई उद्वाहक अधिनियम, १९३९

## अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **उद्देशिका** | | |
| **कलमे** | | |
| १. | संक्षिप्त नाव. ... ... ... ... ... | १ |
| २. | व्याप्ती व प्रारंभ. ... ... ... ... ... | १ |
| ३. | व्याख्या. ... ... ... ... ... | २ |
| ४. | उद्वाहक बसविण्याची परवानगी. ... ... ... ... ... | ३ |
| ५. | उद्वाहक वापरण्यासाठी लायसन. ... ... ... ... ... | ३ |
| ६. | अस्तित्वात असलेल्या उद्वाहकांच्या बाबतीत लायसनसाठी अर्ज. ... ... | ४ |
| ७. | लायसनवाचून उद्वाहक न चालविणे. ... ... ... ... ... | ४ |
| ७-क. | बसविलेल्या उद्वाहकांत जादा भाग घालणे किंवा त्यात फेरफार करणे. ... | ४ |
| ८. | (१) उद्वाहक व उद्वाहक बसविणे यांची तपासणी करण्यासाठी कोणत्याही इमारतीत प्रवेश करण्याचा हक्क. | ५ |
| | (२) असुरक्षित स्थितीत असलेल्या उद्वाहकांची दुरुस्ती करण्याविषयी, त्यात फेरफार करण्याविषयी आणि उद्वाहकांचा उपयोग करण्याचे थांबविण्याविषयी आदेश. | ५ |
| ८-क. | तपासणीसाठी मालकाने सवलती देणे. ... ... ... ... ... | ६ |
| ९. | अपघातांची खबर. ... ... ... ... ... | ६ |
| १०. | शासनाचे अधिकार सोपवून देणे. ... ... ... ... ... | ६ |
| ११. | उद्वाहकांची तपासणी. ... ... ... ... ... | ७ |
| ११-क. | फी वसूल करणे. ... ... ... ... ... | ७ |
| १२. | नियम करण्याचा अधिकार. ... ... ... ... ... | ७ |
| १३. | शास्ती. ... ... ... ... ... | ८ |
| १३-क. | नोटिसा, आदेश अथवा दस्तऐवज बजावणे. ... ... ... ... | ८ |
| १३-ख. | सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्यांबद्दल संरक्षण. ... ... ... ... | ९ |
| १३-ग. | शासनाच्या मालकीच्या उद्वाहकांस हा अधिनियम लागू असणे. ... ... | ९ |
| १४. | व्यावृत्ती. ... ... ... ... ... | १० |


वि (एच) ७३५—१

# सन १९३९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०[1]

[मुंबई उद्‌वाहक (लिफ्ट) अधिनियम, १९३९] *

[१७ मे १९३९]

ह्या अधिनियमांत पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :–

सन १९४५ चा मुंबई अधिनियम, १७. †

सन १९५५ चा मुंबई अधिनियम, ३२.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश १९५६.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम, २८.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम, २०.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम, १९(१-१०-१९७७).

## [2] [मुंबई राज्यात] काही प्रकारचे उद्‌वाहक (लिफ्टस्) व तत्संबंधी सर्व यंत्रसमूह व उपकरणे ह्यांची रचना, ती सुस्थितीत ठेवणे व बिनधोकपणे चालविणे यासाठी नियमन करण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** यात यापुढे सांगितलेल्या रीतीने [2][मुंबई राज्यात] काही प्रकारचे उद्‌वाहक (लिफ्टस्) व तत्संबंधी सर्व यंत्रसमूह व उपकरणे ह्यांची रचना, ती सुस्थितीत ठेवणे व बिनधोकपणे चालविणे यासाठी नियमन करण्याची तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :--

**१.** ह्या अधिनियमास मुंबई उद्‌वाहक (लिफ्ट) अधिनियम, १९३९ असे म्हणावे. **संक्षिप्त नाव.**

**२.** [3][(१) हा अधिनियम सबंध [4][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे. **व्याप्ती व प्रारंभ.**

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९३८, भाग ५, पृष्ठ ६६५ किंवा मुंबई विधानसभा १९३९, आवृत्ती ५ वी, पृष्ठ ३४६५ किंवा मुंबई विधान परिषद १९३९, आवृत्ती ६ वी, पृष्ठ ७७७ पहा. प्रवर समितीच्या अहवालासाठी, मुंबई शासन राजपत्र, १९३९, भाग ५, पृष्ठ १७९-१८२ पहा. विधानसभेतील कामकाजासाठी, मुंबई विधानसभा १९३९, आवृत्ती ५ वी, पृष्ठ ७३-७५, २२६९, ३०७५ आणि ३२०१-३२०३ आणि विधान परिषदेतील कामकाजासाठी, मुंबई विधान परिषद १९३९, आवृत्ती ६ वी, पृष्ठ ६२२-६२६ पहा.

२. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ३(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३(२) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

४. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

† ही खूण अधिनियमाचा प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

* मुंबई उद्‌वाहक अधिनियम, १९३९ हा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू नव्हता त्या भागास याद्वारे लागू करण्यात आला. (१९५८ चा मुंबई २८, कलम २ पहा.)

(२) तो, [१][पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात] [२][राज्य] शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे जी तारीख नेमील त्या तारखेस [३][अंमलात येईल ; आणि [४][महाराष्ट्र राज्याच्या] ज्या भागात तो मुंबई
१९५८ चा उद्‌वाहक (व्याप्ती) अधिनियम, १९५७, याद्वारे लागू करण्यात आला असेल त्या भागात तो राज्य शासन
मुंबई २८. तशाच रीतीने प्रसिद्ध झालेल्या अधिसूचनेद्वारे नेमील अशा इतर तारखेस अंमलात येईल.]

व्याख्या. **३.** विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास, ह्या अधिनियमात :–

(क) "उद्‌वाहक निरीक्षक" या संज्ञेचा अर्थ, उद्‌वाहक निरीक्षक म्हणून [२][राज्य] शासनाने नेमलेला अधिकारी असा समजावा,

(ख) "लायसन " म्हणजे कलम ५ अन्वये दिलेले लायसन,

(ग) "उद्‌वाहक (लिफ्ट)" या संज्ञेचा अर्थ, जी जवळजवळ उभ्या रेषेच्या दिशेत सरकते, जी शक्तीच्या (पॉवरच्या) साह्याने चालते व जीतून [५][उतारू किंवा माल किंवा दोन्ही नेण्याची योजना असते] अशी [६][गाडी] जोडलेले वर उचलण्याचे यंत्र असा समजावा,

[७][***] [८][(घ) "उद्‌वाहक गाडी" या संज्ञेचा अर्थ, उतारू किंवा माल किंवा दोन्ही वाहून नेण्यासाठी उपयोगात आणलेला उद्‌वाहकाचा पिंजरा किंवा गाडी असा समजावा व तीत तळ (फ्लोअर) किंवा उच्चासन (प्लॅटफॉर्म), गाडीची चौकट, भारयष्टि (स्लींग) व परिवेष्टन करणारा मुख्य भाग यांचा समावेश होतो. परंतु तीत ज्यास कारखाने अधिनियम, १९४८ लागू आहे अशा उच्चलनयंत्राचा किंवा उद्‌वाहकाचा समावेश होत नाही.]

(ङ.) "उद्‌वाहक बसविणे" या शब्दप्रयोगात उद्‌वाहक [५][गाडी], उद्‌वाहकाचा मार्ग, उद्‌वाहकाच्या मार्गाची परिवेष्टित जागा, उद्‌वाहक चालविण्याचा यंत्रसमूह व उद्‌वाहक चालविण्याच्या कामाशी प्रत्यक्ष संबंध असलेले सर्व दोर, केबल्स, तारा व संयंत्र (प्लांट) यांचा समावेश होतो,

(च) "उद्‌वाहकाचा मार्ग" या शब्दांचा अर्थ, ज्या दांड्यामध्ये उद्‌वाहक [५][गाडी] खालीवर जाते तो दांडा असा समजावा,

(छ) "उद्‌वाहकाच्या मार्गाची परिवेष्टित जागा" या शब्दप्रयोगात उद्‌वाहकाच्या मार्गाच्या सभोवतालच्या किंवा त्यास परिवेष्टित करणाऱ्या कोणत्याही कायमच्या मजबूत बांधणीचा समावेश होतो,

---

१. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ३(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
२. मुंबई विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
३. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ३(२)(ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
४. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
५. सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२ कलम २(१)(ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
६. वरील अधिनियमाच्या कलम २(१)(अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
७. वरील अधिनियमाच्या कलम २(१)(क) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.
८. सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम २(२) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

(ज) "शक्ती (पॉवर)" या शब्दाचा अर्थ, जी मानवांच्या किंवा जनावरांच्या सहाय्याने उत्पन्न केली जात नाही अशी कोणत्याही प्रकारची शक्ती असा समजावा,

(झ) "विहित" म्हणजे नियमांनी विहित केलेले,

(ञ) "नियम" म्हणजे कलम १२ अन्वये केलेले नियम.

**उद्वाहक बसविण्याची परवानगी.**

**४.** ह्या अधिनियमाच्या सुरुवातीनंतर ज्याच्या मालकीची एखादी जागा आहे अशा प्रत्येक मालकाने अशा जागेत उद्वाहक बसविण्याचा त्याचा इरादा असल्यास असा उद्वाहक बसविण्याची परवानगी मिळण्याकरिता [1][राज्य] शासन याबाबत अधिकार देईल अशा अधिकाऱ्यांकडे अर्ज केला पाहिजे. असा अर्ज लेखी असून विहित करण्यात येईल अशा नमुन्याप्रमाणे असला पाहिजे. अशा अर्जात पुढील गोष्टी निर्दिष्ट करण्यात आलेल्या असल्या पाहिजेत :–

(१) उद्वाहकाचा प्रकार,

(२) उद्वाहकाचा ठरविलेला कमाल वेग,

(३) उद्वाहक तयार करणारा किंवा त्याची योजना ओखणारा याने ठरवून दिलेले वजनाचे प्रमाण,

(४) उद्वाहक चालविणाऱ्या इसमाशिवाय आणखी उद्वाहकांतून नेता येईल अशा उतारूंची कमाल संख्या,

(५) कमाल बोजा नेणाऱ्या उद्वाहक [2][गाडीचे] एकूण वजन,

(६) प्रति-भाराचे (काऊंटरवेटचे) वजन,

(७) आधारभूत केबल्सची संख्या, वर्णन, वजन व आकार,

(८) उद्वाहक सर्वात खालच्या मजल्यावर असताना [2][गाडीच्या] सर्वात खालच्या भागापासून खड्ड्याची खोली,

(९) तुळ्या (बीम्स) चे वजन व आकारमान यांसह वरच्या बाजूस करावयाच्या व्यवस्थेच्या बांधणीसंबंधी विहित करण्यात येईल असा तपशील,

(१०) विहित करण्यात येईल असा इतर तपशील.

असा अर्ज मिळाल्यावर ह्या कलमाअन्वये अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने, आवश्यक अशी चौकशी केल्यानंतर व अर्जदारास आवश्यक अशी माहिती पुरविण्यास सांगितल्यावर, तो अर्ज आपल्या शेऱ्यासह [1][राज्य] शासनाकडे पाठविला पाहिजे. त्यानंतर [1][राज्य] शासनास परवानगी देण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार आहे. अशी परवानगी ती देण्यात आल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंतच फक्त अंमलात राहील.

**उद्वाहक वापरण्यासाठी लायसन.**

**५.** (१) कलम ४ अन्वये ज्यास उद्वाहक बसविण्याची परवानगी देण्यात आली असेल अशा प्रत्येक जागेच्या मालकाने असा उद्वाहक बसविण्याचे काम पुरे झाल्यानंतर एक महिन्याच्या आत, असे काम पुरे झाल्याबद्दलची लेखी नोटीस [1][राज्य] शासन याबाबत अधिकृत करील अशा अधिकाऱ्यास दिली पाहिजे किंवा पाठविली पाहिजे किंवा त्यास देण्याची किंवा पाठविण्याची व्यवस्था केली पाहिजे व उद्वाहक चालविण्याच्या लायसनसाठी त्यांजकडे अर्ज केला पाहिजे.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) पोट-कलम (१) अन्वये लायसन मिळण्यासाठी करावयाचा अर्ज विहित करण्यात येईल अशा नमुन्याप्रमाणे असला पाहिजे. [१][अशा अर्जासोबत विहित करण्यात येईल अशी फी भरण्यात येईल.]

(३) असा अर्ज मिळाल्यावर [२][राज्य] शासनाने याबाबत अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने आवश्यक अशी चौकशी केल्यानंतर तो अर्ज आपल्या शेऱ्यांसह [२][राज्य] शासनाकडे पाठविला पाहिजे. त्यानंतर [२][राज्य] शासनाला लायसन देण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार आहे.

[३] [***]

**अस्तित्वात असलेल्या उद्वाहकांच्या बाबतीत लायसनसाठी अर्ज.**

६. (१) कलमे ४ व ५ यांमध्ये काहीही असले तरी, ह्या अधिनियमाच्या सुरुवातीच्या तारखेपूर्वी ज्या जागेत उद्वाहक बसविण्यात आला असेल अशा जागेच्या प्रत्येक मालकाने अशा तारखेपासून दोन महिन्यांच्या आत असा उद्वाहक चालविण्याच्या लायसनसाठी अर्ज केला पाहिजे.

(२) कलम ५ ची पोट-कलमे (२) ते (४) ह्यांच्या तरतुदी शक्य तेथवर अशा अर्जास लागू असतील.

**लायसनवाचून उद्वाहक न चालविणे.**

७. याबाबत करण्यात येतील अशा नियमांस अधीन राहून कोणताही उद्वाहक त्यासाठी दिलेल्या लायसनच्या अटींचे पालन केल्यावाचून चालविता कामा नये :

परंतु, ह्या कलमातील कोणतीही तरतूद ह्या अधिनियमाच्या सुरुवातीच्या तारखेस बसविलेल्या उद्वाहकास, अशा तारखेपासून दोन महिन्यांच्या मुदतीपर्यंत किंवा कलम ६ च्या तरतुदींस अनुसरून त्या मुदतीच्या आत लायसनसाठी अर्ज करण्यात येईल तर अशा अर्जाचा उक्त कलमाअन्वये अखेरचा निकाल करण्यात येईतोपर्यंत लागू असणार नाही.

**बसविलेल्या उद्वाहकात जादा भाग घालणे किंवा त्यात फेरफार करणे.**

[४][**७-क.** राज्य शासनाने याबाबत अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या आगाऊ लेखी परवानगीवाचून, कोणत्याही बसविलेल्या उद्वाहकात कलम ८, पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असतील त्याव्यतिरिक्त इतर जादा भाग घालता कामा नये किंवा त्यात इतर फेरफार करता कामा नये.]

---

१. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २(ब) अन्वये पोट-कलम (४) वगळण्यात आले.

४. सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम ४ अन्वये कलम ७-क समाविष्ट करण्यात आले.

८. (१) [1][राज्य] शासनाने याबाबत अधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास, जीत उद्वाहक बसविलेला असेल किंवा बसविण्यात येत असेल किंवा जिच्या संबंधात लायसनसाठी अर्ज मिळालेला असेल अशा कोणत्याही इमारतीत, तिचा भोगवटा करणाऱ्या इसमास वाजवी नोटीस देऊन असा उद्वाहक किंवा तो बसविण्याचे काम किंवा उद्वाहकाची जागा तपासण्याच्या कारणासाठी, कोणत्याही वेळी प्रवेश करण्याचा अधिकार आहे.

**उद्वाहक व उद्वाहक बसविणे यांची तपासणी करण्यासाठी कोणत्याही इमारतीत प्रवेश करण्याचा हक्क.**

(२) अशा तपासणीनंतर कोणत्याही इमारतीतील कोणताही उद्वाहक असुरक्षित स्थितीत आहे असे अधिकाऱ्याचे मत झाल्यास, त्यास अशा इमारतीच्या मालकास [2][किंवा कलम ९, पोट-कलम (२) अन्वये नेमलेल्या त्याच्या अभिकर्त्यास] आदेश देऊन त्यात निर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आत, अशा उद्वाहकात त्यास आवश्यक वाटतील अशा दुरुस्त्या किंवा फेरफार करण्याविषयी फर्माविण्याचा अधिकार आहे. तसेच त्यास, आवश्यक असेल तर आणखी अशा दुरुस्त्या किंवा फेरफार करण्यात येईपर्यंत किंवा अशी असुरक्षित स्थिती नाहीशी करण्यात येईपर्यंत अशा उद्वाहकाचा उपयोग करण्याचे बंद ठेवण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार आहे. [3][त्यानंतर यथास्थिती अशा मालकाने किंवा त्याच्या अभिकर्त्याने अशा आदेशाचे त्यात निर्दिष्ट केलेल्या मुदतीत पालन केले पाहिजे आणि आदेशाचे अशा रीतीने पालन करण्यात आल्याचे अशा अधिकाऱ्यास ताबडतोब लेखी कळविले पाहिजे.] [4][* * *]

**असुरक्षित स्थितीत असलेल्या उद्वाहकांची दुरुस्ती करण्याविषयी, त्यात फेरफार करण्याविषयी आणि उद्वाहकांचा उपयोग करण्याचे थांबविण्याविषयी आदेश.**

[5][(३) पोट-कलम (२) अन्वये अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही इसमास अशा आदेशाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत राज्य शासनाकडे अपील करण्याचा अधिकार आहे.

(४) पोट-कलम (३) अन्वये राज्य शासनाकडे कोणतेही अपील केले असले तरीही, पोट-कलम (२) अन्वये अशा अधिकाऱ्याने उद्वाहक बंद ठेवण्याविषयी दिलेला कोणताही आदेश, राज्य शासनाने तो तहकूब केला नसल्यास, पाळण्यात आला पाहिजे.

(५) अशा अधिकाऱ्याने पोट-कलम (२) अन्वये दिलेला आदेश हा, राज्य शासनाकडे करण्यात आलेले अपील व त्यावर राज्य शासनाने दिलेला निर्णय यास अधीन राहून अखेरचा असेल.]

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम ५(१)(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५(१)(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ५(१)(क) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ५(२) अन्वये ही पोट-कलमे समाविष्ट करण्यात आली.

**तपासणीसाठी मालकाने सवलती देणे.** [१][८-क. ज्या इमारतीत उद्‌वाहक बसविण्यात आला असेल त्या इमारतीच्या मालकाने किंवा कलम ९, पोट-कलम (२) अन्वये नेमलेल्या त्याच्या अभिकर्त्याने कलम ८ अन्वये उद्‌वाहकाची तपासणी करण्यासाठी अशा अधिकाऱ्यास सर्व वाजवी सवलती दिल्या पाहिजेत आणि अधिकाऱ्याकडून जेव्हा जेव्हा तसा आदेश देण्यात येईल तेव्हा तेव्हा अशा तपासणीच्या वेळी त्याने उद्‌वाहक बसविण्यासाठी किंवा तो सुस्थितीत ठेवण्यासाठी ज्या इसमाबरोबर करार केला असेल त्या इसमास किंवा उद्‌वाहकाची तपासणी करण्याच्या कामी अधिकाऱ्यास मार्गदर्शन करण्यास सक्षम असलेल्या इसमाच्या प्रतिनिधीस आपल्या खर्चाने हजर केले पाहिजे.]

**अपघातांची खबर.** **९.** (१) जेव्हा कोणताही उद्‌वाहक चालू असताना कोणताही अपघात होईल [२][व त्यायोगे कोणत्याही इसमास दुखापत होईल किंवा दुखापत होण्याचा संभव असेल तेव्हा] जीत उद्‌वाहक चालू असेल त्या इमारतीच्या मालकाने किंवा जर अशा मालकाने एखादा अभिकर्ता नेमला असेल व त्याचे नाव पोट-कलम (३) अन्वये उद्‌वाहक निरीक्षकास कळविले असेल तर, अशा अभिकर्त्याने, अशा अपघातानंतर शक्य तितक्या लवकर अशा अपघाताची नोटीस त्याच्या सविस्तर तपशीलासह उद्‌वाहक निरीक्षकास व [३][बृहन्मुंबईत] पोलीस कमिशनर व इतरत्र जिल्हा फौजदारी न्यायाधीश [४][किंवा राज्य शासन आदेश देऊन निर्दिष्ट करील असा इतर अधिकारी] यांसही दिली पाहिजे व [५][त्याने अशा उद्‌वाहकात कोणत्याही प्रकारे ढवळाढवळ करता कामा नये आणि] असा उद्‌वाहक चालू करण्याचे काम [६][राज्य] शासनाने याबाबत अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीवाचून पुन्हा सुरू करता कामा नये.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनाकरिता, जीत उद्‌वाहक बसविण्यात आला असेल अशा प्रत्येक इमारतीच्या मालकास असा उद्‌वाहक चालू असता घडणाऱ्या कोणत्याही अपघाताची नोटीस देण्यासाठी ज्या शहरात किंवा गावात अशी इमारत असेल तेथे राहणाऱ्या एखाद्या इसमास अभिकर्ता म्हणून नेमण्याचा अधिकार आहे आणि जर असा मालक अशा इमारतीत राहत नसेल तर, त्याने असा अभिकर्ता नेमला पाहिजे.

(३) पोट-कलम (२) अन्वये नेमलेल्या प्रत्येक अभिकर्त्याचे नाव उद्‌वाहक निरीक्षकास कळविण्यात आले पाहिजे.

**शासनाचे अधिकार सोपवून देणे.** **१०.** [६][राज्य] शासनास, त्यास ह्या अधिनियमान्वये किंवा तद्‌नुसार मिळालेल्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार, त्यास योग्य वाटेल अशा अधिकाऱ्याकडे सोपवून देण्याचा अधिकार आहे.

---

१. सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम ६ अन्वये कलम ८-क समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम ९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ३(३) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५. सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम ७(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

६. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**११.** प्रत्येक उद्‌वाहक [1][राज्य] शासनाने याबाबत अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून सहा महिन्यांतून निदान एकदा तपासण्यात आला पाहिजे. [2][अशा तपासणीसाठी विहित करण्यात येईल अशा दराने वार्षिक फी आकारण्यात येईल] व अशा फीमध्ये मोटारच्या तपासणीच्या आकाराचाही समावेश होईल. **उद्‌वाहकांची तपासणी.**

[3][**११-क.** ह्या अधिनियमान्वये द्यावयाच्या फीच्या सर्व रकमा ज़मीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येतील.] **फी वसूल करणे.**

**१२.** (१) ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठी [1][राज्य] शासनास वेळोवेळी राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे [4][आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून] नियम करण्याचा अधिकार आहे. **नियम करण्याचा अधिकार.**

(२) विशेषेकरून व वरील तरतुदींच्या सामान्यतेस बाध येऊ न देता, असे नियम पुढील गोष्टींसाठी करता येतील :–

(क) उद्‌वाहकांच्या रचनेबाबतचा तपशील,

(ख) ज्या रीतीने उद्‌वाहक बसविण्याचे नकाशे सादर केले पाहिजेत ती रीत,

(ग) ज्या रीतीने उद्‌वाहकाची कसोटी पाहता येईल ती रीत,

(घ) उद्‌वाहक बसविण्यासाठी व तो चालविण्याबाबत लायसन मिळविण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना,

(ङ.) कलम ७ अन्वये उद्‌वाहक चालविण्यासाठी ज्या नमुन्याप्रमाणे लायसन दिले पाहिजे तो नमुना व ज्या अटींस व शर्तीस अधीन ठेवून लायसन दिले पाहिजे त्या अटी व शर्ती,

(च) कलम ७ अन्वये ज्या रीतीने व ज्या अटींस अधीन राहून उद्‌वाहक चालविण्यात आला पाहिजे ती रीत व त्या अटी.

[5][ (चक) कलम ७ खालील, उद्‌वाहक चालविण्यासाठीच्या लायसनसाठी करावयाच्या अर्जाच्या संबंधात देय असलेली फी आणि कलम ११ अन्वये उद्‌वाहकाच्या तपासणीसाठी देय असलेली वार्षिक फी, या फीच्या रकमा उद्‌वाहकाच्या वेगवेगळ्या वर्गासाठी वेगवेगळ्या असू शकतील आणि अशी फी देण्याची रीत]

(छ) ज्या रीतीने अपघातांची नोटीस दिली पाहिजे ती रीत व ज्या नमुन्याप्रमाणे अशी नोटीस दिली पाहिजे तो नमुना, [6][**]

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम ८ अन्वये कलम ११-क समाविष्ट करण्यात आले

४. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ४(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ४(ब)(एक) अन्वये खंड (चक) समाविष्ट करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम ४(ब) (दोन) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

(ज) कलम ८ अन्वये द्यावयाच्या नोटीशीचा नमुना.

[1][(झ) विहित करावयाची किंवा विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.]

[2][(३) ह्या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून यथास्थिती, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येईल किंवा येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.]

शास्ती.

**१३.** जो कोणी, ह्या अधिनियमाच्या तरतुदींचे, नियमांचे किंवा लायसनच्या शर्तींचे अगर ह्या अधिनियमान्वये उद्‌वाहक निरीक्षकाने दिलेल्या निदेशाचे उल्लंघन करील तो, दोषी ठरविण्यात आला असता, पराकाष्ठा पाचशे रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र होईल आणि उल्लंघन चालू राहिल्याचे बाबतीत अशा पहिल्या उल्लंघनाबद्दल दोषी ठरविण्यात आल्यावर ज्या ज्या दिवशी असे उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी पराकाष्ठा पन्नास रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

**नोटीसा, आदेश अथवा दस्तऐवज बजावणे.**

[3][**१३-क.** (१) जी कोणतीही नोटीस, आदेश किंवा दस्तऐवज ह्या अधिनियमान्वये किंवा तद्‌नुसार कोणत्याही इसमाच्या नावे पाठविणे भाग असेल किंवा पाठविण्यासाठी अधिकार देण्यात आला असेल अशी प्रत्येक नोटीस, आदेश किंवा दस्तऐवज पोस्टाने पाठवून बजावता येईल, किंवा–

(क) जेव्हा तो स्थानिक प्राधिकाऱ्याच्या नावे पाठवावयाचा असेल तेव्हा, तो स्थानिक प्राधिकाऱ्याच्या कार्यालयात ठेऊन बजावता येईल ;

(ख) जेव्हा तो कंपनीच्या नावे पाठवावयाचा असेल तेव्हा, तो कंपनीच्या नोंदलेल्या कार्यालयात किंवा कंपनीचे नोंदलेले कार्यालय भारताच्या बाहेर असल्यास, कंपनीच्या भारतातील मुख्य कार्यालयात ठेऊन बजावता येईल ;

(ग) जेव्हा तो कोणत्याही इतर इसमाच्या नावे पाठवावयाचा असेल तेव्हां तो त्या इसमाच्या नेहमीच्या किंवा शेवटी माहीत असलेल्या राहण्याच्या किंवा धंद्याच्या ठिकाणी ठेऊन बजावता येईल.

(२) जी कोणतीही नोटीस, आदेश किंवा दस्तऐवज ह्या अधिनियमान्वये किंवा तद्‌नुसार कोणत्याही जागेच्या मालकाच्या किंवा त्याच्या अभिकर्त्याच्या किंवा त्याचा भोगवटा करणाऱ्या इसमाच्या

---

१. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ४(ब) (तीन) अन्वये खंड (झ) समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ४(क) अन्वये पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.

३. सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम ९ अन्वये कलमे, १३-क, १३-ख, आणि १३-ग समाविष्ट करण्यात आली.

नावे पाठविणे भाग असेल किंवा पाठविण्यासाठी अधिकार देण्यात आला असेल अशी प्रत्येक नोटीस, आदेश किंवा दस्तऐवज हा, जर तो जागेचा "मालक" किंवा "मालकाचा अभिकर्ता" किंवा "भोगवटा करणारा इसम" असे वर्णन देऊन (व जागेचे नाव घालून) पाठविण्यात आला असेल तर, योग्य रीतीने पाठविण्यात आला आहे असे समजले पाहिजे ;आणि तो किंवा त्याची अस्सल प्रत जागेत हजर असणाऱ्या कोणत्याही इसमाच्या स्वाधीन करून अथवा वाजवी दक्षता घेऊन ज्याच्या स्वाधीन करता येईल असा कोणताही इसम जागेत सापडत नसल्यास जागेच्या कोणत्याही ठळक भागावर लावून बजावता येईल.

**सद्भावना-पूर्वक केलेल्या कृत्यांबद्दल संरक्षण.**

**१३-ख.** ह्या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा जे करण्याचा इरादा आहे अशा कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कारवाई दाखल करता कामा नये.

**शासनाच्या मालकीच्या उद्वाहकांस हा अधिनियम लागू असणे.**

**१३-ग.** ह्या अधिनियमाच्या तरतुदी शासनाने बसविलेल्या उद्वाहकांना लागू होतील आणि उक्त तरतुदी अशा उद्वाहकांना लागू करताना, त्यात पुढीलप्रमाणे अनुकूलन व सुधारणा करण्यात आल्या आहेत असे समजले पाहिजे :–

[१][(१) कलम ६, पोट-कलम (१) मध्ये "ह्या अधिनियमाच्या सुरुवातीच्या तारखेपूर्वी" ह्या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "लायसनसाठी अर्ज केला पाहिजे" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा :–

"मुंबई उद्वाहक (सुधारणा) अधिनियम, १९५५ अंमलात येण्यापूर्वी ज्या सरकारने किंवा ज्या सरकारच्या वतीने उद्वाहक बसविला असेल त्या सरकारने उक्त तारखेपासून दोन महिन्यांच्या आत लायसनसाठी अर्ज केला पाहिजे ;"

(२) कलम ७ च्या परंतुकात, "ह्या अधिनियमाच्या सुरुवातीच्या तारखेस बसविलेल्या उद्वाहकास" या शब्दानंतर पुढील मजकूर दाखल करण्यात यावा :–

"किंवा मुंबई उद्वाहक (सुधारणा) अधिनियम, १९५५ अंमलात येण्यापूर्वी सरकारने बसविलेल्या उद्वाहकास ;"].

(३) कलम ८ मध्ये :–

(अ) पोट-कलम (३) मध्ये, "राज्य शासनाकडे" या शब्दाऐवजी "राज्य शासनाने याबाबत नेमलेल्या अपील प्राधिकाऱ्याकडे" हे शब्द दाखल करण्यात यावे.

(ब) पोट-कलमे (४) व (५) मध्ये, "राज्य शासनाकडे" व "राज्य शासनाने" हे शब्द जेथे जेथे येतील तेथे तेथे त्याऐवजी "अपील प्राधिकाऱ्याकडे" व "अपील प्राधिकाऱ्याने" हे शब्द अनुक्रमे दाखल करण्यात यावे.

---

१. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ३(४) अन्वये खंड (१) व (२) दाखल करण्यात आले.

(४) कलम ९, पोट-कलम (२) याच्याऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा :-

" (२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनांकरिता, जीत सरकारने उद्वाहक बसविला असेल अशा प्रत्येक इमारतीसाठी सरकारने, असा उद्वाहक चालू असता घडणाऱ्या कोणत्याही अपघाताची नोटीस देण्यासाठी ज्या शहरात किंवा गावात अशी इमारत असेल तेथे राहणाऱ्या एखाद्या इसमास अभिकर्ता म्हणून नेमले पाहिजे."

(५) कलम १३ गाळण्यात यावे.

(६) कलम १३-अ, पोट-कलम (१), खंड (अ) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात यावा :-

"(अ) जेव्हा तो सरकारच्या नावे पाठवावयाचा असेल तेव्हा, कलम ९, पोट-कलम (२) अन्वये सरकारने नेमलेल्या अभिकर्त्याच्या कचेरीत ठेऊन बजावता येईल ;"

**व्यावृत्ती.** **१४.** ह्या अधिनियमातील कोणत्याही तरतुदींमुळे भारतीय विद्युतशक्ति अधिनियम, १९१० याच्या तरतुदीस किंवा तद्न्वये केलेल्या कोणत्याही नियमास बाध येणार नाही. **१९१० चा ९**

---

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६.